# पुणे महानगरपालिका

## उद्यान विभाग

व

## वृक्ष प्राधिकरण

आयोजित

## ४४ वे फळे, फुले, भाजीपाला स्पर्धा व प्रदर्शन

२०२६

| ❀ उद्घाटन समारंभ ❀ | ❀ बक्षिस समारंभ ❀ |
|---|---|
| दिनांक १४-२-२०२६ रोजी | दिनांक १५-२-२०२६ रोजी |
| सकाळी ११-०० वाजता. | सायंकाळी ५-०० वाजता. |

❀ स्थळ ❀

छत्रपती संभाजीराजे उद्यान, जंगली महाराज रस्ता,
शिवाजीनगर, पुणे ४११ ००५.
संपर्क क्रमांक : (०२०) २५५०१५५३

करा वृक्षांवर माया, मिळेल थंडगार छाया !

# • अंतरंग •


| तपशील | | | पान क्र. |
|---|---|---|---|
| • | प्रदर्शनासंबंधी सूचना, नियम व अटी | | ३ |
| • | विभाग १ : | शोभिवंत पाना-फुलांच्या कुंड्यांची मांडणी | ५ |
| • | विभाग २ : | फुलांची कलात्मक मांडणी व सजावट | ७ |
| • | विभाग ३ : | गुलाबपुष्प मांडणी | ८ |
| • | विभाग ४ : | हंगामी तसेच वार्षिक फुले (Cut Flowers) | ९ |
| • | विभाग ५ : | निर्यातक्षम फुले (गुलाब, जरबेरा, कार्नेशन, ॲन्थुरियम, ऑर्किड, लिलियम) | १० |
| • | विभाग ६ : | खास विभाग | ११ |
| • | विभाग ७ : | फळे | १२ |
| • | विभाग ८ : | उत्तम भाज्यांचा संग्रह | १२ |
| • | विभाग ९ : | फुले, फळे व भाजी यांचे प्रक्रिया करून केलेले पदार्थ | १३ |
| • | विभाग १० : | निसर्ग व पर्यावरण यांवर आधारित छायाचित्रे | १३ |
| • | विभाग ११ : | बाग स्पर्धा | १३ |
| • | विभाग १२ : | वृक्ष संवर्धन स्पर्धा | १५ |


❄ ❄ ❄

## ४४ वे फळे, फुले, भाजीपाला स्पर्धा व प्रदर्शनाबाबत माहितीपत्रक

### : सूचना :

१. प्रदर्शनाच्या प्रवेशपत्रिका मा. वृक्ष अधिकारी तथा सदस्य सचिव, वृक्ष प्राधिकरण कार्यालय, शिवाजीनगर-घोलेरोड क्षेत्रीय कार्यालय, शिवाजीनगर, पुणे ५ यांचे कार्यालयात दि. १९-१-२०२६ ते ३०-१-२०२६ अखेर मिळतील व तेथेच दि. ३०-१-२०२६ पर्यंत स्वीकारल्या जातील.

२. प्रदर्शनातील विभाग - १ मध्ये शोभिवंत पाना-फुलांच्या कुंड्यांची मांडणी दि. १३-२-२०२६ रोजी सकाळी ८ ते २ वाजेपर्यंत करावी. या विभागाचे परीक्षण दि. १३-२-२०२६ रोजी दुपारी ३-०० वाजता सुरू होईल.

३. विभाग क्र. २ ते १० मधील सर्व गट व पोटविभागांची मांडणी दि. १४-२-२०२६ रोजी सकाळी ९ वाजेपर्यंत करणे आवश्यक आहे. या विभागाचे परीक्षण सकाळी ९ वाजता सुरू होईल.

४. उमेदवारांनी फुले ठेवण्यासाठी लागणारी पुष्पपात्रे स्वतः आणावीत, मौल्यवान अशी पुष्पपात्रे कृपया आणू नयेत.

५. उमेदवारांनी प्रदर्शनात मांडलेल्या पुष्पपात्रांच्या रक्षणाची जबाबदारी मनपातर्फे केली जाईल, परंतु ती सांभाळण्याची मुख्य जबाबदारी उमेदवारांचीच आहे.

६. प्रदर्शनात ठेवण्यात येणारी फुले, फळे, भाजीपाला किंवा इतर वस्तूंची खराबी, मोडतोड अगर गहाळ झाल्यास त्यास मनपा जबाबदार राहणार नाही.

७. मनपाच्या सक्षम अधिकाऱ्यास प्रदर्शनात मांडण्याकरिता आणलेली कोणतीही वस्तू कारण दाखविल्याशिवाय नाकारण्याचा हक्क राहील.

८. उमेदवारांनी प्रदर्शनात मांडलेल्या वस्तू दि. १६-२-२०२६ रोजी परत केल्या जातील.

९. प्रदर्शनात ठेवण्यात येणाऱ्या वस्तू या नियमाप्रमाणे नसल्यास किंवा निकृष्ट दर्जाच्या असल्यास त्यास पारितोषिके दिली जाणार नाहीत.

१०. प्रदर्शनातील वस्तूंचे परीक्षण चालू असताना कोणत्याही उमेदवारास मंडपात हजर राहता येणार नाही, नियमांचा भंग करणाऱ्या उमेदवारांच्या वस्तू बक्षिसास अपात्र ठरतील.

ॐ वृक्षो रक्षकी रक्षतः ॐ

११. प्रदर्शनात ठेवण्यात येणाऱ्या सर्व वस्तू या उमेदवारांच्या मालकीच्या असाव्यात अगर त्यांनी स्वतःच्या देखरेखीखाली तयार केलेल्या असाव्यात.

१२. प्रदर्शनामध्ये मांडणी केलेली फुले, भाजीपाला व फळे इ. बाबींचे वर महानगरपालिकेची मालकी राहील तसेच त्यांची विल्हेवाट लावण्याचा अधिकारही महानगरपालिकेस राहील.

१३. सर्व नागरिकांना हे प्रदर्शन विनामूल्य पाहण्यासाठी दि. १४-२-२०२६ रोजी सकाळी ११-०० वा. (उद्घाटनानंतर) ते सायंकाळी ८-३० वाजेपर्यंत व दि. १५-२-२०२६ रोजी सकाळी ८-०० ते सायंकाळी ८-३० वाजेपर्यंत खुले राहील.

## : नियम व अटी :

- स्पर्धेमध्ये सहभाग घेतलेल्या सर्व पाना-फुलांच्या जाती प्रामुख्याने कुंडीमध्ये वाढविलेल्या असाव्यात, तसे नसल्यास सदरची मांडणी बक्षिसास अपात्र ठरेल. विशेषतः हंगामी फुलांचे कुंड्यांमध्ये आयत्यावेळी फुलांच्या जाती भरून कुंड्यांची मांडणी केल्याचे निदर्शनास आल्यास, अशी मांडणी बक्षिसास अपात्र ठरेल.
- स्पर्धेमध्ये मांडलेला भाजीपाला व फळे ही संबंधित उमेदवारांनी स्वतः वाढविलेली असावीत. आयत्या वेळी बाजारातून आणून मांडल्याचे निदर्शनास आल्यास त्या बक्षिसास अपात्र ठरेल.
- परीक्षकांनी दिलेला निर्णय हा अखेरचा असेल व तो बंधनकारक राहील.
- प्रत्येक गटातील पोटविभागात किमान तीन स्पर्धकांनी भाग घेणे आवश्यक आहे. कमी स्पर्धक असलेल्या पोटविभागांचा बक्षिसासाठी विचार केला जाणार नाही.
- विभाग क्र. ११ व १२ बाग स्पर्धा व वृक्ष संवर्धन स्पर्धा यांमध्ये दि. ३०-१-२०२६ अखेर सायंकाळी ५-३० वाजेपर्यंत सहभाग घेता येईल आणि त्यांचे परीक्षण दि. ३-२-२०२६ ते दि. ९-२-२०२६ या कालावधीत करण्यात येईल. या विभागासाठी पुणे, पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या हद्दीचाच विचार करण्यात येईल.

---

## ❀ विभाग १ ❀

## • शोभिवंत पाना-फुलांच्या कुंड्यांची मांडणी •

**शुक्रवार, दिनांक १३-२-२०२६**

**(मांडणी : वेळ स. ८-०० ते दु. २-००, परीक्षण : दु. ३-०० वा.)**

**गट क्र. १ : फुलांच्या कुंड्या** किमान ०६ कुंड्या (किमान २ प्रकार)

| | |
|---|---|
| ( १ ) साल्व्हिया - उंच / बुटका | ( २ ) झेंडू उंच / बुटका |
| ( ३ ) ॲस्टर | ( ४ ) फ्लॉक्स |
| ( ५ ) पिंक | ( ६ ) व्हर्बिना |
| ( ७ ) पिटुनिया | ( ८ ) जरबेरा |
| ( ९ ) बालसम | (१०) जिरॅनियम |
| (११) बिगोनिया | (१२) गुलाब (फ्लोरिबंडा, एचटी, मिनिएचर) |
| (१३) डेलिया | (१४) ग्लॅडिओलस् |
| (१५) गुलछडी | (१६) ॲन्टिर्‍हिनम |
| (१७) हॉलीहॉक | (१८) झिनिया |
| (१९) शेवंती | (२०) जास्वंद |
| (२१) लिली | (२२) हायड्रेंजिया |
| (२३) स्पॅथीफायलम | (२४) पॉईनसेटिया |
| (२५) डेझी | (२६) बोगनवेल |
| (२७) कॅलेंडुला | (२८) हेलीक्रिझम |
| (२९) हेलिकोनिया | (३०) कॅलेंच्यु |

ध्ध धरती मातेचे ऋण, फेडू करून वृक्षारोपण ! ध्ध

**गट क्र. २ : शोभिवंत पानांच्या कुंड्या** किमान ०६ कुंड्या (किमान ३ प्रकार)

**(अ)**

| | |
|---|---|
| ( १ ) क्रोटन्स | ( २ ) ड्रेसिना |
| ( ३ ) मरांटा | ( ४ ) डायफनबेकीया |
| ( ५ ) ॲग्लोनिमा | ( ६ ) कोलीयस |
| ( ७ ) नेचे (फर्न्स) | ( ८ ) बिगोनिया |
| ( ९ ) पेप्रोमिया | (१०) फिलोडेंड्रान |
| (११) पाम | (१२) निवडुंग |
| (१३) सकुलंट | (१४) साँग ऑफ इंडिया |
| (१५) फायकस | (१६) गवत (शोभिवंत) (पंपास ग्रास, बांबू ग्रास) |
| (१७) मॉनस्टेरा | (१८) कॅलेडियम |
| (१९) ॲकेलिफा | (२०) अरेलिया |
| (२१) जुनिफर | (२२) सिगोंनियम |
| (२३) मनिप्लान्ट | (२४) शैफ्लेरा |

**गट क्र. ३ : शोभिवंत पानांच्या कुंड्यांची मांडणी** (किमान ३० कुंड्या)

**गट क्र. ४ : शोभिवंत फुलांच्या कुंड्यांची मांडणी** (किमान ३० कुंड्या)

**गट क्र. ५ : औषधी वनस्पतींचा संग्रह** (किमान २५ कुंड्या)
**टीप** : प्रत्येक वनस्पतीस शास्त्रीय, सामान्य नाव व उपयोग यांचे लेबल लावावे.

**गट क्र. ६ : सुगंधी वनस्पतींचा संग्रह** (किमान २५ कुंड्या)
**टीप** : प्रत्येक वनस्पतीस शास्त्रीय, सामान्य नाव व उपयोग यांचे लेबल लावावे.

**गट क्र. ७ : कुंड्यामधील भाजीपाला संग्रह** (किमान १० कुंड्या)

**गट क्र. ८ : फिचर गार्डन** (आकार २५' x २०')

पर्यावरणाचा बिघडतोय तोल, वनीकरणाने राहील समतोल !

## ❀ विभाग २ ❀

## • फुलांची कलात्मक मांडणी व सजावट •

**शनिवार, दिनांक १४-२-२०२६ (मांडणी : वेळ स. ७-०० ते ९-००, परीक्षण : स. ९-०० नंतर)**

**गट क्र. १ :**

**(अ) पुष्परचना**

(१) पुष्पपात्र सजावट (पानाफुलांचा वापर करून)

(२) पुष्पपात्र सजावट (पानाफुलांसह विविध साहित्य वापरून)

(३) पुष्पपात्र सजावट (शालेय विद्यार्थ्यांसाठी)

**(ब) टेबलावर फुलांची रांगोळी (आकार ३x३ फूट)**

**(क) फुलांची सजावट**

(१) पुष्पगुच्छ (२) शिप

(३) हार (४) वेणी

(५) गजरे

**गट क्र. २ : फुलांची कलात्मक मांडणी** (खास महानगरपालिका माळी सेवकांसाठी)

(१) पुष्पपात्र सजावट (२) पुष्पगुच्छ

(३) शिप (४) हार

(५) वेणी

**गट क्र. ३ : पुष्परचना व पानाफुलांची कलात्मक मांडणी** (खास पुष्पविक्रेत्यांसाठी)

**गट क्र. ४ : कोणत्याही फुलांची एकत्रित मांडणी** (कमीत कमी २५ फुले)

**टीप** : ( १ ) प्रत्यक्ष येऊन जागेवर मांडणी करणे.

( २ ) कृत्रिम साहित्य व फुले यांचा वापर करू नये.

हिरवा परिसर जीवन नवे, एकतरी झाड लावायलाच हवे !

## ❀ विभाग ३ ❀

# गुलाब पुष्प मांडणी

**गट क्र. १ : पोट विभाग** (फुलांची नावे द्यावीत)

| पोट विभाग | नग संख्या |
|---|---|
| ( १ ) ग्लॅडिअेटर | १ |
| ( २ ) तांबडा | १ |
| ( ३ ) पांढरा | १ |
| ( ४ ) पिवळा | १ |
| ( ५ ) फिक्कट गुलाबी | १ |
| ( ६ ) गर्द गुलाबी | १ |
| ( ७ ) जांभळा, आकाशी | १ |
| ( ८ ) शेंदरी | १ |
| ( ९ ) दुरंगी | १ |
| (१०) सुवासिक गुलाब | १ |
| (११) ३ फुले | ३ जाती |
| (१२) ६ फुले | ३ जाती |
| (१३) ६ फुले | ६ जाती |
| (१४) ६ फुले | कोणतेही रंग |
| (१५) १२ फुले | ४ जाती |
| (१६) १२ फुले | १२ जाती |
| (१७) १२ फुले | कोणतेही रंग |
| (१८) फ्लॉरिबंडा | १ |
| (१९) फ्लॉरिबंडा | ३ जाती |
| (२०) मिनीएचर | १ नग |
| (२१) मिनीएचर | ३ जाती |
| (२२) भारतीय गुलाब | १ जात |

ꕥ धष्टपुष्ट ही वने, धूर्त पावसाचे नाही उणे ! ꕥ

## ❀ विभाग ४ ❀

## हंगामी तसेच वार्षिक फुले (Cut Flowers)

**गट क्र. १ : हंगामी / वार्षिक फुले**

| पोट विभाग | नग संख्या |
|---|---|
| ( १ ) ॲन्टिऱ्हीनम | १० |
| ( २ ) ॲस्टर | १० |
| ( ३ ) झेंडू | १० |
| ( ४ ) लार्कस्पर | १० |
| ( ५ ) डेझी | १० |
| ( ६ ) शेवंती | १० |
| ( ७ ) हॉलिहॉक | ९ |
| ( ८ ) पिंक | १० |
| ( ९ ) स्वीट विल्यम | १० |
| (१०) स्टॅटिस | १० |
| (११) हेलीक्रिझम | १० |
| (१२) साल्व्हिया | १० |
| (१३) कॅलेंडुला | १० |
| (१४) झिनिया | १० |
| (१५) निशिगंध | १० |
| (१६) ग्लॅडिओलस (३ रंग) | १० |
| (१७) डेलिया | १० |
| (१८) कर्दळ (३ रंग) | १० |

**गट क्र. २ : हंगामातील कोणत्याही स्थानिक वृक्षांची फुले** (फांदीसह)

## ❀ विभाग ५ ❀

## निर्यातक्षम फुले (गुलाब, जरबेरा, कार्नेशन, ॲन्थुरियम, ऑर्किड, लिलियम)

### ⚜ गट क्र. १ : गुलाब फुलांची मांडणी

(१) गुलाब फुले १२ फुले
(कमीत कमी ४ रंग)

(२) गुलाब फुले ३ फुले
(एका रंगाची कळी, मध्यम व पूर्ण उमललेल्या अवस्थेतील)

### ⚜ गट क्र. २ : जरबेरा फुलांची मांडणी

| | पोट विभाग | नग संख्या |
|---|---|---|
| (१) | जरबेरा | ६ फुले (एक रंग) |
| (२) | जरबेरा | ६ फुले (कोणतेही रंग) |
| (३) | जरबेरा | १२ फुले (तीन रंग) |
| (४) | जरबेरा | १२ फुले (एक रंग) |

### ⚜ गट क्र. ३ : कार्नेशन फुलांची मांडणी

| | पोट विभाग | नग संख्या |
|---|---|---|
| (१) | कार्नेशन | ६ फुले (कोणतेही रंग) |
| (२) | कार्नेशन | ६ फुले (तीन रंग) |
| (३) | कार्नेशन | १२ फुले (कोणतेही रंग) |
| (४) | कार्नेशन | ६ फुले (तीन रंग) |

**गट क्र. ४ : ॲन्थुरियम फुलांची मांडणी**

| | पोट विभाग | नग संख्या |
|---|---|---|
| (१) | ॲन्थुरियम | ३ फुले (एक रंग) |
| (२) | ॲन्थुरियम | ३ फुले (कोणतेही रंग) |
| (३) | ॲन्थुरियम | ६ फुले (एक रंग) |
| (४) | ॲन्थुरियम | ६ फुले (कोणतेही रंग) |

**गट क्र. ५ : ऑर्किड फुलांची मांडणी**

ऑर्किड – ५ फुले (कोणतेही रंग)

**गट क्र. ६ : लिलियम फुलांची मांडणी**

लिलियम – ५ फुले (कोणतेही रंग)

**गट क्र. ७ : वैशिष्ट्यपूर्ण वस्तूपासून केलेली हँगिंग बास्केट**

## ❀ विभाग ६ ❀

## खास विभाग (सर्वांसाठी)

| | | |
|---|---|---|
| (१) | निवडक बोन्साय झाड | किमान २ कुंड्या |
| (२) | नैसर्गिक काष्ठ शिल्पांचे प्रकार | किमान २ प्रकार |
| (३) | मिनिचर डिश गार्डन | किमान २ कुंड्या |
| (४) | शोभिवंत वेलींची बास्केट (हँगिंग बास्केट) | किमान २ कुंड्या |
| (५) | ऑर्किड (फुलांसह) | किमान २ कुंड्या |
| (६) | कमळ/कमलिनी | किमान २ कुंड्या |
| (७) | स्थानिक वैशिष्ट्यपूर्ण झाड | किमान २ कुंड्या |

## ❀ विभाग ७ : फळे ❀

**(अ) फळे (देठ–पानांसह मांडणी)**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (१) | चिक्कू | ६ नग | (९) | लिंबू | ६ नग |
| (२) | पेरू | ६ नग | (१०) | केळी | २ घड |
| (३) | डाळिंब | ६ नग | (११) | नारळ | २ नग |
| (४) | द्राक्षे | २ घड | (१२) | बोर | १२ नग |
| (५) | पपई | २ नग | (१३) | सिताफळ | ६ नग |
| (६) | संत्रे | ६ नग | (१४) | अंजीर | ६ नग |
| (७) | मोसंबी | ६ नग | (१५) | रामफळ | ६ नग |
| (८) | चिंच | ६ नग | (१६) | पपनस | ६ नग |

## ❀ विभाग ८ ❀

## उत्तम भाज्यांचा संग्रह

**(अ) उत्तम भाज्यांचा संग्रह**

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | पालेभाज्या | : | २ प्रकार प्रत्येकी (२ जुडी) |
| (२) | मूळभाज्या | : | २ प्रकार प्रत्येकी (२ जुडी) |
| (३) | फळभाज्या | : | २ प्रकार (प्रत्येकी २ नग) |
| (४) | फुलभाज्या | : | ४ प्रकार |
| (५) | शेंगभाज्या | : | २ प्रकार (प्रत्येकी २५० ग्रॅम) |
| (६) | वेलवर्गीय भाज्या | : | २ प्रकार (प्रत्येकी १ नग) |
| (७) | उत्तम भाज्यांचा संग्रह | : | १० प्रकार (प्रत्येकी १ नग) |
| (८) | परदेशी भाज्यांचे प्रकार | : | २ प्रकार (२ नग) |

## ❀ विभाग ९ ❀

### ⚜ फुले, फळे व भाजी यांचेवर प्रक्रिया करून केलेले पदार्थ ⚜

**(प्रत्येकी ३ प्रकार)**

(१) भाज्यांचेवर प्रक्रिया करून तयार केलेले पदार्थ

(२) फळांचेवर प्रक्रिया करून तयार केलेले पदार्थ

(३) फुलांचेवर प्रक्रिया करून तयार केलेले नैसर्गिक सुगंधी द्रव्य

(४) सॅलड डेकोरेशन

## ❀ विभाग १० ❀

### ⚜ निसर्ग व पर्यावरणावर आधारित छायाचित्रे (सर्वांसाठी) ⚜

(अ) कोणत्याही फुलाचे छायाचित्र. उदा. गुलाब, जरबेरा वगैरे.

(ब) एखाद्या उद्यानाचे छायाचित्र

(क) निसर्ग व पर्यावरणावर आधारित छायाचित्र.

टीप : (१) छायाचित्राचा आकार ८''x १०'' असावा.

(२) स्पर्धेमध्ये मांडलेली छायाचित्रे परत केली जाणार नाहीत.

## ❀ विभाग ११ ❀

### बाग स्पर्धा

**(पुणे, पिंपरी–चिंचवड महापालिका हद्द)**

**(अर्ज स्वीकारणे अंतिम दिनांक ३०–१–२०२६, परिक्षण दिनांक ३ ते ९ फेब्रुवारी, २०२६)**

**⚜ गट क्र. १ : बागस्पर्धा**

(अ) अर्धा एकरापर्यंत

(ब) एक एकरापर्यंत

(क) एक ते अडीच एकरांपर्यंत

(ड) अडीच एकरांपुढील

- **गट क्र. २ : वैयक्तिक बाग**
  - (अ) १,००० चौरस फुटांपर्यंत
  - (ब) १,००० ते २,००० चौरस फुटांपर्यंत
  - (क) २,००० चौ. फुटांपुढील

- **गट क्र. ३ : किचन गार्डन**
  - (अ) ५०० चौ. फुटांपर्यंत
  - (ब) १,००० चौ. फुटांपर्यंत
  - (क) १,५०० चौ. फुटांपर्यंत

- **गट क्र. ४ : टेरेस गार्डन**
  - (अ) १,००० चौ. फुटांपर्यंत
  - (ब) १,००० ते २,५०० चौ. फुटांपर्यंत
  - (क) २,५०० चौ. फुटांपुढील

- **गट क्र. ५ : मनपा बागा** (फक्त माळी सेवकांसाठी)
  - (अ) एक एकरापर्यंत
  - (ब) दोन एकरापर्यंत
  - (क) दोन ते पाच एकरांपर्यंत
  - (ड) पाच एकरांपुढील

- **गट क्र. ६ : औषधी वनस्पती लागवड** (सर्वांसाठी)

- **गट क्र. ७ : रोपवाटिका (नर्सरी)** (सर्वांसाठी)

- **गट क्र. ८ : वाहतूक बेटे (आयलॅण्ड)**
  - (अ) मनपा जागेवरील
  - (ब) खाजगी जागेवरील

- **गट क्र. ९ : रस्त्याच्या कडेचे व दुभाजकातील सुशोभीकरण**
  - (अ) मनपा जागेवरील
  - (ब) खाजगी जागेवरील

## ❀ विभाग १२ ❀

## वृक्ष संवर्धन स्पर्धा

**(अर्ज स्वीकारणे अंतिम दिनांक ३०–१–२०२६, परिक्षण दिनांक ३ ते ९ फेब्रुवारी, २०२६)**

- **गट क्र. १ : खाजगी जागेवरील वृक्षारोपण व संवर्धन** (किमान १०० वृक्ष)
- **गट क्र. २ : सरकारी जागेवरील वृक्षारोपण व संवर्धन** (किमान १०० वृक्ष)

**: नियम :**

- सदरहू स्पर्धेमध्ये वृक्षारोपण व संवर्धनाचा उद्देश असून, यांमध्ये उद्यानाचा अंतर्भाव असणार नाही. मागील ३ वर्षांमध्ये केलेले वृक्षारोपण व त्याची सुयोग्य देखभाल यांचा विचार केला जाणार आहे. शक्यतो स्थानिक/देशी जातीच्या वृक्षाची लागवड केलेली असावी. प्रवेशपत्रिकेबरोबर वृक्षलागवडीचे फोटो लावणे आवश्यक आहे.
- वरील नियमानुसार प्रवेश पत्रिकेबाबत अंतिम निर्णय परिक्षक घेतील.

❋ ❋ ❋

मुद्रणमहर्षि मामाराव दाते मुद्रणालय, पुणे मनपा ३३५ (५०० पुस्तिका) १–२६

**मा. नवल किशोर राम, प्रशासक व आयुक्त तथा अध्यक्ष, वृक्ष प्राधिकरण,** पुणे महानगरपालिका यांनी पुणे महानगरपालिका मुद्रणमहर्षि मामाराव दाते मुद्रणालय, सिंहगड रोड, वडगांव बु., पुणे ४१ येथे छापले व पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे ५ येथे प्रसिद्ध केले.

हिरवा परिसर जीवन नवे, एकतरी झाड लावायलाच हवे !

# पुणे महानगरपालिका

## उद्यान विभाग

व

## वृक्ष प्राधिकरण

आयोजित

## ४४ वे फळे, फुले, भाजीपाला स्पर्धा व प्रदर्शन

## २०२६

दि. १४ व १५ फेब्रुवारी, २०२६

: स्थळ :

छत्रपती संभाजीराजे उद्यान, जंगली महाराज रस्ता,
शिवाजीनगर, पुणे ४११ ००५.

# आपणांस माहित आहे का ?

- संपूर्ण पुणे महानगरपालिका अधिकार क्षेत्रास महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ चा कायदा लागू करण्यात आला आहे.
- विकसनाच्या कामास अडथळा करणारी झाडे, आरोग्य व जीवितास धोका असणारी झाडे अथवा अन्य कोणतीही झाडे तोडावयाची असल्यास अथवा विस्तार / फांद्या कमी करावयाच्या असल्यास मा. वृक्ष प्राधिकरण / मा. वृक्ष अधिकारी यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे.
- वरील कायद्यान्वये आपणांकडून दरवर्षी वृक्षकर आकारण्यात येतो.
- वरील कायद्यानुसार झाडे तोडणे, जाळणे (किंवा कोणत्याही प्रकारे झाडांस हानी पोहचविणे) असे कोणतेही कृत्य करणे हा गुन्हा आहे.
- महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ मधील तरतुदींचे उल्लंघन करून जी व्यक्ती कोणतेही झाड तोडील किंवा कोणतेही झाड तोडण्यास कारणीभूत होईल किंवा वृक्ष अधिकाऱ्याने किंवा वृक्ष प्राधिकरणाने लादलेल्या शर्तींचे किंवा दिलेल्या आदेशांचे पालन करण्यात वाजवी सबबीशिवाय कसूर करील किंवा वृक्ष प्राधिकरणाच्या सदस्यास किंवा वृक्ष अधिकाऱ्यास किंवा त्याला दुय्यम असलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास या अधिनियमाखालील त्यांची कर्तव्ये पार पाडण्यात स्वेच्छेने अडथळा आणील त्या व्यक्तीला अपराधसिध्दीनंतर, प्रत्येक अपराधाकरिता शासनद्वारे अधिसूचित करण्यात येईल अशा पध्दतीचा वापर करून, काढलेल्या झाडाच्या मुल्याइतके परंतु एक लाख रुपयांपेक्षा अधिक नसेल इतक्या रकमेच्या द्रव्य दंडाची व एक आठवड्यापेक्षा कमी नसेल व एक वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाची देखील शिक्षा होईल.
- कोणतीही व्यक्ती विनापरवाना झाडे तोडीत असल्यास किंवा विस्तार कमी करीत असल्यास कृपया **संबंधित क्षेत्रीय कार्यालयाकडील मा. महापालिका सहाय्यक आयुक्त तथा वृक्ष अधिकारी यांचेकडे तक्रार दाखल करण्यात यावी.** दूरध्वनी क्र. ०२०-२५५०१५५३ किंवा पुणे महानगरपालिका टोल फ्री क्रमांक १८००१०३०२२२ वरही तक्रार करता येईल. त्याचबरोबर ९६८९९०००००२ या व्हॉटस ॲप क्रमांकाद्वारे व **www.complaint.pmc.gov.in** या पोर्टलवरही तक्रार दाखल करता येते.
- याबाबत अधिक माहिती **www.pmc.gov.in** या संकेतस्थळावर ''**विभाग**'' या लिंकवर ''**वृक्ष प्राधिकरण विभाग**'' या शीर्षकाखाली उपलब्ध होईल त्याचबरोबर **मा. सदस्य सचिव, वृक्ष प्राधिकरण कार्यालय, शिवाजीनगर-घोले रोड क्षेत्रीय कार्यालय इमारत, २ रा मजला, शिवाजीनगर, पुणे ४११००५** या कार्यालयाशी संपर्क साधावा.

❋ ❋ ❋

मु.मा.दा.मुद्रणालय, पुणे मनपा. (३४२) ५००-१२-२५



# पुणे महानगरपालिका
## वृक्ष प्राधिकरण
## फळे, फुले व भाजीपाल्याचे प्रदर्शन
## प्रवेश पत्रिका

(विभाग क्र. १ ते १०)

प्रति,
**मा. वृक्ष अधिकारी,**
**पुणे महानगरपालिका**

| अ. क्र. | विभाग क्र. | गट क्र. | पोट विभाग क्र. | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |
| ६ | | | | |
| ७ | | | | |
| ८ | | | | |
| ९ | | | | |
| १० | | | | |
| ११ | | | | |
| १२ | | | | |
| १३ | | | | |
| १४ | | | | |
| १५ | | | | |
| १६ | | | | |
| १७ | | | | |
| १८ | | | | |
| १९ | | | | |
| २० | | | | |
| | | | | |

मी/आम्ही असे जाहीर करतो की, उपरोक्त नमूद केलेल्या प्रदर्शनातील विभागामध्ये/गटामध्ये मांडलेल्या कुंड्या, फळे, फुले व भाजीपाला स्वतः अथवा स्वतःच्या देखरेखीखाली तयार केलेले आहेत. स्पर्धेच्या सर्व अटी वाचल्या असून त्या आम्हावर बंधनकारक आहेत.

नाव : .....

पूर्ण पत्ता (नजीकच्या खुणेसह) : .....

.....

ई-मेल : .....

दूरध्वनी क्रं :

स्पर्धकाची सही

मु.मा.दा.मुद्रणालय, पुणे मनपा. (३४३) ५००-१२-२५



# पुणे महानगरपालिका
## वृक्ष प्राधिकरण
## फळे, फुले व भाजीपाल्याचे प्रदर्शन
## प्रवेश पत्रिका

**(विभाग क्र. ११ व १२) बाग स्पर्धा व वृक्षसंवर्धन स्पर्धा**

प्रति,
**मा. वृक्ष अधिकारी,**
**पुणे महानगरपालिका**

| अ. क्र. | विभाग क्र. | गट क्र. | पोट विभाग क्र. | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |
| ६ | | | | |
| ७ | | | | |
| ८ | | | | |
| ९ | | | | |
| १० | | | | |
| ११ | | | | |
| १२ | | | | |
| १३ | | | | |
| १४ | | | | |
| १५ | | | | |
| १६ | | | | |
| १७ | | | | |
| १८ | | | | |
| १९ | | | | |
| २० | | | | |
| | | | | |

मी/आम्ही असे जाहीर करतो की, उपरोक्त नमूद केलेल्या प्रदर्शनातील विभागामध्ये/गटामध्ये भाग घेतलेल्या बागा / वृक्ष हे स्वतः अथवा स्वतःच्या देखरेखीखाली तयार केलेले आहेत. स्पर्धेच्या सर्व अटी वाचल्या असून त्या आम्हावर बंधनकारक आहेत.

नाव : .....

पूर्ण पत्ता (नजीकच्या खुणेसह) : .....

.....

ई-मेल : .....

दूरध्वनी क्रं :

सोबत : फोटो जोडलेले आहेत / नाहीत.

स्पर्धकाची सही